अंक १

ॐ

# संस्कृत-स्वयं-शिक्षक.

(संस्कृत भाषेचें अध्ययन करण्याचा सोपा उपाय.)

## भाग १ वा.

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
088057

श्रीपाद दामोदर सातवळेकर,
स्वाध्याय-मंडल, औंध, (जि० सातारा.)

द्वितीय आवृत्ति

संवत् १९८८, शक १८५३, सन १९३१.

किंमत पांच आणे

# व्यंजनान्त शब्दांचीं रूपें.

---

याच्या पूर्वीच्या भागांमध्यें स्वरान्त नामांचीं रूपें कशीं बनवावीं तें दाखवलें. आतां ज्या नामांच्या शेवटीं व्यंजन अस[ते] त्यांचीं रूपें कशीं बनवावीं तें दाखवावयाचें आहे. जर वाचक[ांनीं] ह्या भागांत दाखवलेल्या शब्दरूपांचा विशेष अभ्यास केला तर त्यांस सर्व व्यंजनान्त नामांचीं रूपें सहज बनवतां येतील. म्हणून वाचकांनीं ह्या भागाचा अभ्यास विशेष काळजीपूर्वक करावा.

हीं रूपें पाठ करण्याची आवश्यकता आहे असें नाहीं. प[रंतु] शब्दांच्या रूपांतील विशेषता तेवढी अवश्य लक्ष्यांत ठेवावी.

जर वाचकांनीं या प्रमाणें या रूपांचा अभ्यास केला तर त्य[ांचा] प्रवेश संस्कृतमध्यें अगदीं सहज होईल.

स्वाध्याय मंडळ,
औंध जि. (सातारा)
६।११।३१

लेखक
श्री० दा० सातवळे[कर]

---

मुद्रक व प्रकाशक— श्री. दा. सातवळेकर,
भारत मुद्रणालय, स्वाध्यायमंडल,
औंध, ( जि. सातारा. )

ॐ

[library stamp]

# संस्कृत-स्वयं-शिक्षक.

## नववा भाग.

—०—

### पाठ १

आतां या घडयांत पुढील श्लोकांचा अभ्यास करा-

विवस्वानुवाच ।

यत्तेऽभिलषितं किंचित्तत्वं सर्वमवाप्स्यसि ।
अहमन्नं प्रदास्यामि सप्त पंच च ते समाः ॥

म. भारत. वन० अ० ३ । ७१

अन्वय- यत् किंचित् ते अभिलषितं तत् सर्वं त्वं अवाप्स्यसि। सप्त पंच च समाः अहं ते अन्नं प्रदास्यामि ।

संस्कृत टीका - यत् किंचित् ते तव अभिलषितं अभीष्टं अस्ति तत् सर्वं त्वं अवाप्स्यसि प्राप्स्यसि। सप्त पंच च द्वादश समाः वर्षाणि पर्यंतं अहं ते तुभ्यं अन्नं प्रदास्यामि दास्यामि ।

अर्थ - जें काय तुला इष्ट असेल तें सर्व तुला प्राप्त होईल. सात व पांच वर्षे मी तुला अन्न देईन.

*

गृह्णीष्व पिठरं ताम्रं मया दत्तं नराधिप ।
यावद्वत्स्यति पांचाली पात्रेणानेन सुव्रत ॥ ७२ ॥
फलमूलामिषं शाकं संस्कृतं यन्महानसे ।
चतुर्विधं तदन्नाद्यमक्षय्यं ते भविष्यति ॥ ७३ ॥

अन्वय- हे नराधिप ! मया दत्तं ताम्रं पिठरं गृह्णीष्व। हे सुव्रत! अनेन पात्रेण यावत् पांचाली वत्स्यति तावत् यत् महानसे संस्कृतं फलमूलामिषं शाकं चतुर्विधं तत् ते अन्नाद्यं अक्षय्यं भविष्यति ।

संस्कृत टीका- हे नराधिप ! नराणां मनुष्याणां अधिप राजन् ! मया दत्तं ताम्रं ताम्रनिर्मितं पिठरं पात्रं गृह्णीष्व गृहाण । हे सुव्रत! हे उत्तमव्रतचारिन् । अनेन पात्रेण पिठरेण यावत् पांचाली द्रौपदी वत्स्यति वृत्तिं जनजीविकारूपां करिष्यति तावत्कालपर्यंतं यत् तव महानसे पाकगृहे संस्कृतं कृतं फलमूलामिषं, फलं च मूलं च आमि[illegible] च शाकं च चतुर्विधं अन्नं तत् ते तव अन्नाद्यं अन्नादिकं अक्षय[illegible] क्षयरहितं भविष्यति ।

अर्थ - हे राजा ! मी दिलेली ही तांब्याची परात घे. हे उत्त[illegible] उत्तम व्रत करणाऱ्या ! ह्या परातींतून जापर्यंत द्रौपदी वाढील[illegible] तोंपर्यंत जें स्वयंपाकघरांत तयार केलेलें फलमूल मांस शा[illegible] वगैरे चार प्रकारचें तें तुझें अन्नादिक अक्षय्य होईल. ( म्हण[illegible] अन्न संपणार नाहीं.)

लब्ध्वा वरं तु कौन्तेयो जलादुत्तीर्य धर्मवित् ।
जग्राह पादौ धौम्यस्य भ्रातृंश्च परिषस्वजे ॥

म. भारत वन० ३ । ८१

अन्वय - धर्मवित् कौन्तेयः तु वरं लब्ध्वा, जलात् उत्तीर्य, धौम्यस्य पादौ जग्राह, भ्रातृन् च परिषस्वजे ।

संस्कृत टीका-धर्मवित् धर्मं वेत्ति जानाति इति धर्मवित् धर्म-

ज्ञानी कौन्तेयः कुन्तीपुत्रः धर्मराजः तु वरं लब्ध्वा प्राप्य जलात् सलिलात् उत्तीर्य निष्क्रम्य धौम्यस्य धौम्यनामकस्य· आचार्यस्य, चरणौ जग्राह गृहीतवान्। भ्रातॄन् बंधून् च परिषस्वजे आलिलिंग।

अर्थ-धर्म जाणणाऱ्या धर्मराजानें वर मिळवून,पाण्यांतून उठून, धौम्याचे पाय धरले व भावांनां आलिंगन दिलें.

द्रौपद्या सह संगम्य वन्द्यमानस्तया प्रभुः।
महानसे तदानीं तु साधयामास पांडवः।

म. भारत. वन०३।८२

अन्वय-द्रौपद्या सह संगम्य, तया वंद्यमानः, प्रभुः पांडवः तदानीं महानसे साधयामास।

संस्कृतटीका-द्रौपद्या पांचाल्या सह संगम्य मिलित्वा तया द्रौपद्या वन्द्यमानः नमस्क्रियमाणः प्रभुः राजा पांडवः धर्मराजः तदानीं तदा एव महानसे पाकगृहे साधयामास पाकक्रियां आरब्धवान्।

अर्थ—द्रौपदीला भेटून, तिनें वंदन केल्यावर पांडव धर्मराजानें त्यावेळीं पाकशाळेंतील कामास आरंभ केला.

संधि।

यत्तेऽभिलषितं = यत् ते अभिलषितं।
यावद्वत्स्यति = यावत् वत्स्यति।
यन्महानसे = यत् महानसे।
तदन्नाद्यं =तत् अन्नाद्यं।
कौन्तेयो जलात् =कौन्तेयः जलात्।
जलादुत्तीर्य =जलात् उत्तीर्य।
भ्रातॄंश्च = भ्रातॄन् च

या धड्यांतील श्लोकांचा व या संधींचा वाचकांनीं उत्तम अभ्यास करावा.

# पाठ २

या धड्यामध्यें चकारान्त शब्दांचीं रूपें कशीं बनतात तें पहा—

चकारान्तः पुल्लिंगः सुवाच् शब्दः ।
( सुवाच् = उत्तम भाषण करणारा ).

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुवाक्, सुवाग् | सुवाचौ | सुवाचः |
| सं हे | ,, ,, | हे ,, | हे ,, |
| २ | सुवाचम् | ,, | ,, |
| ३ | सुवाचा | सुवाग्भ्याम् | सुवाग्भिः |
| ४ | सुवाचे | ,, | सुवाग्भ्यः |
| ५ | सुवाचः | ,, | ,, |
| ६ | ,, | सुवाचोः | सुवाचाम् |
| ७ | सुवाचि | ,, | सुवाक्षु |

याचप्रमाणें पुढील शब्दांचीं रूपें होतात—

शब्द ।

विवाच् = अनेक भाषा बोलणारा

पयोमुच् = मेघ

पर्णमुच् = पानें पाडणारा

कुवाच् = वाईट भाषण करणारा

दुर्वाच् = वाईट भाषण करणारा

प्रवाच् = वक्ता.

वाक्य ।

१ पयोमुचा जलं वर्षितं = मेघानें जल वर्षिलें.

२ स दुर्वाचं पुरुषं निंदति = तो दुष्ट भाषण करणाऱ्या पुरुषाची निंदा करतो.

३ सुवाचे मनुष्याय पारितोषिकं देहि = उत्तम भाषण करणाऱ्या मनुष्यास इनाम दे.

जकारान्तः पुल्लिंगो ' राज् ' शब्दः ।

( राज् = राजा )

| | | | |
|---|---|---|---|
| १ | राट्, राड् | राजौ | राजः |
| सं० | हे ,, | हे ,, | हे ,, |
| २ | राजं | ,, | ,, |
| ३ | राजा | राड्भ्याम् | राड्भिः |
| ४ | राजे | ,, | राड्भ्यः |
| ५ | राजः | ,, | ,, |
| ६ | ,, | राजोः | राजाम् |
| ७ | राजि | ,, | राट्त्सु |

याप्रमाणें पुढील शब्दांचीं रूपें होतात—

परेतराज् = यम

यमराज् = ,,

यक्षराज् = यक्षांचा राजा.

कुरुराज् = कौरवांचा राजा

परिव्राज् = संन्याशी.

विराज् = उत्तम क्षत्रिय.

सम्राज् = सम्राट्.

विभ्राज् = तेजस्वी.

विश्वसृज् = विश्व उत्पन्न करणारा

जनराज् = लोकांचा राजा.

पक्षिराज् = पक्ष्यांचा राजा.

वाक्य ।

१ अस्य देशस्य सम्राजं नमस्कुरु = ह्या देशाच्या सम्राटाला नमस्कार कर.

२ ज्योतिषा विभ्राजं सूर्यं पश्य=तेजानें तेजस्वी अशा सूर्यास पहा.
३ इदानीं जनराड् अत्र न आगमिष्यति=आतां लोकांचा राजा येथें नाहीं येणार.
४ यक्षराड्भिः किं कृतम् = यक्षराजांनीं काय केलें ?
५ परिव्राजः कदा तत्र गमिष्यन्ति=संन्याशी केव्हां तेथें जातील?
६ विश्वसृजं देवाधिदेवं ईश्वरं भज = विश्व उत्पन्न करणाऱ्या देवाधिदेव ईश्वराला भज.
७ यथा पक्षिराड् आकाशे भ्रमति तथा न कः अपि अन्यः भ्रमितुं शक्नोति = जसा पक्ष्यांचा राजा आकाशांत उडतो तसा कोणीही अन्य उडूं शकत नाहीं.

जकारांतः पुंल्लिंगो ‘ हुतभुज् ’ शब्दः ।

| | | | |
|---|---|---|---|
| १ | हुतभुक्,हुतभुग् | हुतभुजौ | हुतभुजः |
| सं० | हे ,, ,, | हे ,, | हे ,, |
| २ | हुतभुजं | ,, | ,, |
| ३ | हुतभुजा | हुतभुग्भ्यां | हुतभुग्भिः |
| ४ | हुतभुजे | ,, | हुतभुग्भ्यः |
| ५ | हुतभुजः | ,, | ,, |
| ६ | ,, | हुतभुजोः | हुतभुजाम् |
| ७ | हुतभुजि | हुतभुजोः | हुतभुक्षु |

या पद्धतीनें पुढील शब्दांचीं रूपें बनतात—

शब्द

| | |
|---|---|
| फलभुज् = फळ खाणारा. | ऋत्विज् = यज्ञ करणारा, |
| महीभुज् = राजा. | भिषज् = वैद्य. |
| भूभुज् = ,, | वणिज् = वाणी. |
| हुतभुज् = अग्नि | अन्नभुज् = अन्न खाणारा. |

वाक्यें.

१ महीभुजा किं न कृतम् ? = राजानें काय नाहीं केलें ?
२ ऋत्विग्भिः यज्ञः कृतः = याजकांनीं यज्ञ केला.
३ यज्ञसमये हुतभुजे हव्यं देहि = यज्ञाच्या वेळीं अग्नीला हव्य दे .
४ वणिग्भिः अस्मिन् वर्षे बहु धनं संपादितं = वाण्यांनीं या वर्षीं पुष्कळ धन मिळविलें .
५ अन्नभुजः मनुष्याः प्रायः विविधं अन्नं प्रातः सायं भक्षयन्ति=अन्न खाणारीं माणसें बहुतकरून विविध अन्न सकाळ-संध्याकाळ खातात .
६ यत्र तौ वणिजौ संस्थितौ तत्रैव अहं हुतभुजं नयामि = जेथें ते ( दोघे ) वाणी उभे आहेत तेथेंच मी अग्नी नेतों.
७ ऋत्विजां यागविषयकं ज्ञानं अतीव शोभनं अस्ति = याजकांचें यज्ञविषयक ज्ञान अति उत्तम आहे.

## सूचना.

वाचकांनीं ह्या धड्यांत दिलेल्या सर्व शब्दांचीं रूपें बनवून, त्यांचा अनेक प्रकारें वाक्यांत उपयोग करून विविध वाक्यें बनवावीं. म्हणजे आपोआपच त्यांनां शब्दांचीं रूपें बनवण्याचा व बनलेल्या रूपांचा उपयोग वाक्यांत करण्याचा उत्तम अभ्यास होईल.

# पाठ ३

## रामायणम् ।

१ विलपन्तीं जननीं कौसल्यां धर्मसहितं वचः धर्मात्मा रामः उवाच ।-'नास्ति मे शक्तिः पितुः वाक्यं समतिक्रमितुम् । प्रसादये त्वां शिरसा । २ अस्माकं एव कुले पितुः सगरस्य आज्ञया भूमिं खनद्भिः सगरपुत्रैः सुमहान् वधः प्राप्तः। जामदग्न्येन रामेण स्वयं जननी अपि पितुर्वचनकारणात् कृत्ता । ३ धर्मो हि लोके परमः । धर्मे सत्यं प्रतिष्ठितम् । सनातनः अयं धर्मः, पितुः नियोगे स्थातव्यं इति । तत् अनुमन्यस्व वनं गमिष्यन्तं माम् ।'४ पितुः निर्देशपालने एवं व्यवसितं तं रामं समीक्ष्य बाष्पसंरुद्धनयना कौसल्या अब्रवीत् । 'पुत्र ! गच्छ त्वं एकाग्रेण मनसा । भद्रं ते अस्तु । अभिरक्षतु त्वां स एव धर्मो यं त्वं पालयसि । सत्येन धर्मेण अभिरक्षितः चिरं जीव इति ।' ५ रामः पुनः मातुः चरणौ अभिवाद्य सीतानिलयं जगाम । ६ तत् सर्वं अजानती तपस्विनी वैदेही यौवराज्याभिषेचनं एव प्रतीक्षती तस्थौ । अवाङ्मुखे पत्यौ प्रविष्टे शोकसंतप्ते च वेपमाना उदपतत् सीता । दृष्ट्वा तां सीतां धर्मात्मा रामः मनोगतं शोकं सोढुं न शशाक । ७ विवृततां च गतः स शोकः । दृष्ट्वा च तत् सा अपि दुःखाभिसंतप्ता अपृच्छत् । 'किमिदं प्रभो ! केन असि दुर्मनाः ? न विराजते छत्रं तव उपरि । नाऽपि व्यजने। अहो अपूर्वश्च मुखवर्णः ।' इति विलपतीं तां सीतां प्रोवाच राघवः । 'प्रव्राजयति मां तत्र भवान् तातः। चतुर्दश हि वर्षाणि वस्तव्यं मया दण्डके। सोऽहं विजनं वनम् प्रस्थितः । त्वां द्रष्टुं इदानीं आगतोऽस्मि ।'

## मराठी वाक्यें.

१ रडत असलेल्या माता कौसल्येला धर्मयुक्त वचन धर्मात्मा राम बोलला.'नाहीं माझी शक्ति बाबांचें वाक्य उल्लंघन करण्यास. प्रसन्न करतो तुला डोकें वांकवून २ आमच्याच कुळांत पिता सगर राजा याच्या आज्ञेनें भूमि खोदत असतां सगर पुत्रांनीं मोठा वध प्राप्त करून घेतला. जामदग्न्य रामानें स्वतः आईला सुद्धां बापाच्या आज्ञेनें कापली. ३ धर्मच लोकांमध्यें श्रेष्ठ आहे. धर्मांत सत्य राहिलें आहे. सनातन हा धर्म आहे कीं बापाच्या आज्ञेंत रहावें असा. तर मला वनाला जाणाऱ्याला आज्ञा दे.' ४ बापाच्या आज्ञापालनामध्यें प्रयत्न करणाऱ्या त्या रामाला पाहून आंसवांनीं डोळे भरलेले आहेत अशा प्रकारची कौसल्या म्हणाली 'मुला! जा तूं एकाग्र मनानें. तुझें कल्याण असो. रक्षण करो तुला धर्म ज्याचें तूं पालन करतोस. सत्य धर्मानें सुरक्षित होऊन चिर. काल जिवंत रहा.' ५ राम नंतर आईच्या चरणांचें वंदन करून सीतेच्या महालांत गेला ६ तें सर्व न जाणणारी तपस्विनी सीता यौवराज्याभिषेकाचीच वाट पाहत उभी होती. खालीं तोंड केलेला पति प्रविष्ट झाला व दुखानें संतप्त झाला आहे असें पाहून कांपत उठली सीता. पाहून त्या सीतेला धर्मात्मा राम मनांतील शोकी सहन करूं शकला नाहीं. ७बाहेर पडला तो शोक. तें पाहून तीही दुःखानें संतप्त होऊन विचारूं लागली-'काय बरें हें प्रभो ! कोणी दुःख दिलें आहे तुला? विराजत नाहीं छत्र तुझ्यावर. नाहीं पंखे. अहो विचित्र झाला आहे तोंडाचा रंग.' ८असें विलाप करणाऱ्या त्या सीतेला राम म्हणाला-'वनांत घालवित आहे मला पूज्य पिता. चवदा वर्षें रहावें मीं दण्डकारण्यांत. तो मी निर्जनवनांत निघालों, तुला पाहण्यासाठीं आलों आहें.'

## समास.

१ सगरपुत्रः सगरस्य पुत्रः ( सगराचा मुलगा )
२ निर्देशपालनं = निर्देशस्य पालनं ( आज्ञेचें पालन )
३ बाष्पसंरुद्धनयना = बाष्पैः संरुद्धः बाष्पसंरुद्धः । बाष्पसंरुद्धे नयने यस्याः सा बाष्पसंरुद्धनयना । ( आंसवांनीं मंद झाली आहे दृष्टि जिची. )
४ सीतानिलयं = सीतायाः निलयं ( सीतेचा महाल )
५ अजानती = न जानती ( न जाणणारी )
६ यौवराज्याभिषेचनं यौवराज्यस्य अभिषेचनं (यौवराज्यावर अभिषेक )
७ शोकसंतप्तः = शोकेन संतप्तः ( शोकानें संतप्त )
८ दुःखाभिसंतप्ता = दुःखेन अभिसंतप्ता ( दुःखानें संतप्त )
९ मुखवर्णः = मुखस्य वर्णः ( तोंडाचा रंग )
१० विजनं = विगताः जनाः यस्मात् ( निर्जन )

## सूचना ।

वाचकांनीं याप्रमाणें समासांचा उत्तम अभ्यास करावा. तसेंच या धड्यांतील संस्कृत वाक्यें वारंवार वाचून तीं अगदीं उत्तम तयार करावीं.

# पाठ ४

या धड्यांत तकारान्त शब्दांचीं रूपें कशीं होतात तें पहा—

तकारान्तः पुल्लिंगो ' भूभृत् ' शब्दः ।

( भूभृत्—राजा )

| | | | |
|---|---|---|---|
| १ | भूभृत् | भूभृतौ | भूभृतः |
| सं० | हे ,, | हे ,, | हे ,, |
| २ | भूभृतं | ,, | ,, |
| ३ | भूभृता | भूभृद्भ्यां | भूभृद्भिः |
| ४ | भूभृते | ,, | भूभृद्भ्यः |
| ५ | भूभृतः | ,, | ,, |
| ६ | ,, | भूभृतोः | भूभृताम् |
| ७ | भूभृति | भूभृतोः | भूभृत्सु |

याप्रमाणें पुढील शब्दांचीं रूपें बनवावीं-

## शब्द.

मरुत् = वारा
विपश्चित् = विद्वान्
अग्निचित् = अग्नि पेटवणारा
महीक्षित् = राजा.
कपालभृत् = कपाळाची खोपडी धारण करणारा—शिव.

क्षमाभृत् = राजा.

१ हे अग्न ! त्वं मरुद्भिः सह आगच्छ = हे अग्ने ! तूं वायूंसह ये.

२ भूभृतां संगमेन किं फलं भवति ? = राजांच्या संगतीनें काय फल होतें ?

३ यत्र सर्वे विपश्चितः भव[illegible]न्ति तत्र धर्मस्य निर्णयः भवति = जेथें सर्व ज्ञानी अ[illegible]सतात तेथें धर्माचा निर्णय होतो.

४ मरुद्भयः हव्यं दे[illegible]हि = मरुतांनां हव्य दे.

५ क्ष्माभृतौ य[illegible] गच्छतः तत्र विपश्चितौ न भवतः = (दोन) राजे जेथें जातात, तेथें (दोन) ज्ञानी नसतात.

६ एतत्[illegible] भवनं पूर्वेण महीक्षिता निर्मितं अस्ति = हें घर पूर्वीच्या राजानें बनवलें आहे.

७ विपश्चिद्भृतोः कः श्रेष्ठतरः? = ज्ञानी व राजा यांत कोण श्रेष्ठ?

८ स्वदेशे राजा पूज्यते, परंतु विपश्चित् सर्वत्र पूज्यते = स्वदेशीं राजा पूजला जातो परंतु विद्वान् सर्वत्र पूजला जातो.

तान्तः पुल्लिंगो 'महत्' शब्दः ।

(महत् = मोठा)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | महान् | महान्तौ | महान्तः |
| सं० | हे महन् | हे ,, | हे ,, |
| २ | महान्तं | ,, | महतः |
| ३ | महता | महद्भ्यां | महद्भिः |
| ४ | महते | ,, | महद्भ्यः |
| ५ | महतः | ,, | ,, |
| ६ | ,, | महतोः | महताम् |
| ७ | महति | ,, | महत्सु |

"महत्" शब्द वास्तविक विशेषण आहे. म्हणून त्याला कोणतेंही लिंग नाहीं. पण हा शब्द जेव्हां पुल्लिंगी शब्दाचें विशेषण बनून वाक्यांत येतो त्यावेळीं याचीं रूपें पुल्लिंगी शब्दाप्रमाणें बनतात. म्हणून हीं रूपें येथें दिलीं आहेत.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

वाक्य ।

१ महद्भ्यः रुद्रेभ्यो नमो नमः = मोठ्या रुद्रांला नमस्कार.

२ यथा पशुषु सिंहः महान्तं शब्दं करोति न तथा अन्यः कः अपि पशुः महान्तं शब्दं कर्तुं शक्तः = ज्याप्रमाणें पशूंमध्यें सिंह मोठा शब्द करतो त्याप्रमाणें दुसरा कोणी पशु मोठा शब्द करूं शकत नाहीं.

## तकारांतः पुलिंगो भगवत् शब्दः ।

( भगवत् = देव, ईश्वर )

| | | |
|---|---|---|
| १ भगवान् | भगवन्तौ | भगवन्तः |
| सं० हे भगवन् | हे " | हे " |
| २ भगवन्तं | " | भगवतः |
| ३ भगवता | भगवद्भ्यां | भगवद्भिः |
| ४ भगवते | " | भगवद्भ्यः |
| ५ भगवतः | " | " |
| ६ " | भगवतोः | भगवताम् |
| ७ भगवति | " | भगवत्सु |

शब्द

नभस्वत् = वायु
धीमत् = बुद्धिवान्
ज्ञानवत् = ज्ञानी
क्रियावत् = पुरुषार्थी
विवस्वत् = सूर्य

राजन्वत् = उत्तम राजानें चालविलेलें राज्य.
बुद्धिमत् = बुद्धिमान्
उदन्वत् = समुद्र
आत्मवत् = आत्मिक बलानें युक्त.
गरुत्मत् = गरुड.

१ भगवान् अत्र आगच्छतु = भगवान् येथें येवो.

२ धीमता पुरुषेण तत्र ग्रंथस्य रचना कर्तुं योग्या = बुद्धिमान् पुरुषानेंच ग्रंथाची रचना करण्यास योग्य.

३ क्रियावतां मनुष्याणां मध्ये आत्मवान् एव श्रेष्ठतरः = पुरुषार्थी मनुष्यांमध्यें ज्ञानीच श्रेष्ठ.

४ विवस्वान् आकाशे तपति = सूर्य आकाशांत तापतो.

५ बुद्धिमता वीरेण एव स्वदेशस्य हिताय युद्धं कर्तव्यं = बुद्धिमान वीरानेंच स्वदेशाच्या हितासाठीं युद्ध करावें.

६ गरुत्मतः अन्यत् नाम गरुडः इति अस्ति = गरुडाचें अन्य नांव गरुड असें आहे.

## सूचना.

वाचकांनीं याप्रमाणें निरनिराळ्या तकारान्त शब्दांचीं रूपें बनवावीं व वाक्यामध्यें त्यांचा उपयोग करावा. अशा रीतिनें शक्य तितकीं अधिक वाक्यें बनवण्याची खटपट करावी. असें केल्यानें त्यांचा प्रवेश संस्कृत भाषेंत लवकर होईल.

# पाठ ५ वा.

## रामायणम् ।

१एवं उक्ता तु वैदेही प्रणयात् एव संक्रुद्धा भर्तारं इदं अब्रवीत्। शस्त्रास्त्रविदुषां वीराणां राजपुत्राणां अनर्हं त्वया उदितम् । न श्रोतव्यं तत् ।२आर्यपुत्र! पिता माता तथा च पुत्रः पुण्यानि भुञ्जानाः स्वं स्वं भाग्यं उपासते । नारी तु एका भर्तुः भाग्यं प्राप्नोति । ततः अहं अपि आदिष्टा एव अस्मिन् वने वस्तव्यं इति । इह प्रेत्य च नारीणां सदा एकः पतिः एव गतिः। हे राघव ! यदि त्वं दुर्गमं वनं प्रस्थितः तर्हि अहमपि कुशकंटकान् मृद्नन्ती ते अग्रतो गमिष्यामि । ३ भुक्तवति त्वयि अहं भोक्ष्ये । वनेऽपि त्वं मम परिपालनं कर्तुं शक्तः । त्वया वियुक्ता अहं मरणे निश्चिता अस्मि। ४ सान्त्वयित्वा तु तां सीतां धर्मात्मा रामः उवाच । सीते ! त्वं कुलीना धर्मनिरता च सदा असि। अतः त्वं इहैव स्वधर्मं समाचर येन मम मनसः सुखं भवेत् । ५ बहुदोषं हि वनं । तत्र सिंहानां व्याघ्राणां च दुःखदा निनादाः, सरितः सग्राहाः, मत्ता गजाः, कण्टकिताः लताश्च । मार्गा अपि निरपाः सुदुःखाश्च । अतः सीते दुःखं वनम् । तत्र च अतीव तिमिरं; महान् वातः, नित्या बुभुक्षा, महान्ति च भयानि संति । ६ एतत् श्रुत्वा दुःखिता सीता रामं उवाच । ये त्वया वने वस्तव्यतां प्रति दोषत्वेन परिकीर्तिताः तान् तव स्नेहेन पुरस्कृतान् गुणान् एव विद्धि । अदृष्टपूर्वं तव रूपं दृष्ट्वा सर्वे वनचारिणः दूरं अपसर्पेयुः। गुरुजनाज्ञया मया त्वया सह वनं अवश्यं गन्तव्यं एव । हे राम ! त्वद्वियोगेन तु मया जीवितमेव त्यक्तव्यम् ।

# मराठी वाक्यें.

१ हें ऐकून सीता नम्रतेनेंच रागाऊन पतिला असें बोलली- शस्त्रास्त्र जाणणाऱ्या वीर राजपुत्रांला अयोग्य असें तुम्ही बोललां- न ऐकावें तें. २ आर्यपुत्रा ! पिता, माता, तसेंच पुत्र पुण्यांचा भोग करतानां आपआपल्या भाग्यालाच प्राप्त होत असतात. स्त्री तर एकटी पतिच्या भाग्यासच प्राप्त होते. म्हणून मलाही आज्ञा झालीच आहे कीं वनांत राहावें अशी. हे रामा ! जर तूं दुर्गम वनांत निघालास तर मीही दर्भ व कांटे काढीत तुझ्या पुढें जाईन. ३ तूं जेवल्यानंतर मी जेवीन. वनामध्येंही तूं माझें पालन करण्यास समर्थ आहेस. तुझ्याविरहित मी मरणाविषयीं निश्चित आहें. ४ सान्त्वन करून त्या सीतेला धर्मात्मा राम म्हणाला, हे सीते ! तूं कुलीन व सदा धर्मांत तत्पर आहेस. म्हणून तूं येथेंच स्वधर्माचें आचरण कर. ज्यानें माझ्या मनाला सुख होईल. ५ पुष्कळ दोष असतात वनांत. तेथें सिंह व वाघ यांचे दुःखदायी शब्द. नद्या मगरांनीं युक्त, माजलेले हत्ती, कांटे असलेल्या वेली असतात. मार्गही पाणी नसलेले व अति दुःखदायी असतात. म्हणून हे सीते ! दुःखदायी वन आहे. तेथें गाढ अंधकार, मोठा वारा व नेहेमीं भूक व मोठीं भयें असतात. ६ हें ऐकून दुःखी सीता रामाला म्हणाली. जे तूं वनांत राहण्यासंबंधानें दोष म्हणून सांगितलेस ते तुझ्या स्नेहानें युक्त झाल्यामुळें गुणच आहेत असें जाण. अदृष्टपूर्व असें तुझें स्वरूप पाहुन सर्व वनसंचारी दूर पळतील. गुरुजनांच्या आज्ञेनें मी तुझ्याबरोबर वनांत अवश्य जावेंच. हे रामा! तुझ्या वियोगानें तर मी प्राणच सोडीन.

## समास

१ शस्त्रास्त्रविद्वान् = शस्त्राणि च अस्त्राणि च शस्त्रास्त्राणि। शस्त्रास्त्राणि वेत्तीति शस्त्रास्त्रविद्वान्। ( शस्त्रास्त्रें जाणणारा )

२ राजपुत्रः = राज्ञः पुत्रः ( राजाचा मुलगा )

३ अनर्ह =न अर्ह ( अयोग्य )

४ कुशकंटकाः = कुशाः च कंटकाः च ( दर्भ व कांटे )

५ धर्मनिरतः =धर्मे निरतः ( धर्मांत रमणारा )

६ स्वधर्मः = स्वस्य धर्मः ( आपला धर्म )

७ बहुदोषं = बहवः दोषाः यस्मिन् तत् ( पुष्कळ दोषयुक्त )

८ दुःखदः = दुःखं ददाति इति ( दुःखदायी )

९ सग्राहा = ग्राहैः सहिता ( मगरांनीं युक्त )

१० निरपाः = अद्भिः रहिताः ( जलरहित )

११ दोषत्वं = दोषस्य भावः ( दोषीपणा )

१२ वनचारिन्=वने चरतीति वनचारी ( वनांत हिंडणारा )

## सूचना.

वाचकांनीं याप्रमाणें या धड्याचा उत्तम अभ्यास करावा. संस्कृत वाक्यें तर वारंवार वाचून उत्तम तयार करण्यास विसरूं नये.

*

## पाठ ६

या धड्यांत दकारान्त शब्दांचीं रूपें दिलीं आहेत त्यांचा उत्तम अभ्यास करा —

दकारान्तः पुल्लिंगः क्रव्याद् शब्दः ।

( क्रव्याद् = मांसभक्षक )

| | | | |
|---|---|---|---|
| १ | क्रव्यात्, क्रव्याद् | क्रव्यादौ | क्रव्यादः |
| सं० | हे क्रव्यात्, क्रव्याद् | हे क्रव्यादौ | हे क्रव्यादः |
| २ | क्रव्यादम् | ,, | ,, |
| ३ | क्रव्यादा | क्रव्याद्भ्यां | क्रव्याद्भिः |
| ४ | क्रव्यादे | ,, | क्रव्याद्भ्यः |
| ५ | क्रव्यादः | ,, | ,, |
| ६ | ,, | क्रव्यादोः | क्रव्यादाम् |
| ७ | क्रव्यादि | ,, | क्रव्यात्सु |

याचप्रमाणें पुढें दिलेल्या शब्दांचीं रूपें होतात—

### शब्द.

| | |
|---|---|
| सुहृद् = मित्र. | तमोनुद् = अंधकारनाशक. |
| दुर्हृद् = दुष्ट शत्रु. | अन्नाद् = अन्नभक्षक. |

### वाक्यें.

१ प्राज्ञेन सुहृदा एव मित्रता कर्तव्या = शहाण्या मित्राशींच मित्रता करावी.

२ दुर्हृदां शत्रूणां सर्वैः अवश्यं निवारणं कर्तव्यं = दुष्ट शत्रूंचें सर्वांनीं अवश्य निवारण करावें.

दकारांतः पुल्लिंगः सुपाद् शब्दः ।

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुपात्, सुपाद् | सुपादौ | सुपादः |
| सं० | ,, ,, | ,, | ,, |
| २ | सुपादं | ,, | ,, |
| ३ | सुपदा | सुपाद्भ्यां | सुपाद्भिः |
| ४ | सुपदे | ,, | सुपाद्भ्यः |
| ५ | सुपदः | ,, | ,, |
| ६ | ,, | सुपदोः | सुपदाम् |
| ७ | सुपदि | ,, | सुपत्सु |

मूळचा "पाद्" शब्द आहे. पण द्वितीयेच्या बहुवचनापासून तृतीया, चतुर्थी, व पंचमी यांच्या द्विवचन व बहुवचन आणि सप्तमीचें बहुवचन सोडून बाकीच्या पुढील रूपांमध्यें "पाद्" शब्दाच्या ऐवजीं "पद्" असेंच रूप होतें; हें वाचकांनीं ध्यानांत ठेवावें. केवळ सप्तमी बहुवचनामध्यें या शब्दाचा हा विशेष वाचकांनीं लक्ष्यांत ठेवावा.

( सुपात् = उत्तम पाय असणारा. )

## वाक्य

१ सुपात् पुरुः महता वेगेन चलति = उत्तम पांय असणारा पुरुष मोठ्या वेगानें चालतो.

२ सुपदां मानवानां यथा गतिः अस्ति तथा तव गमनं भवतु= उत्तम पाय असणाऱ्या मनुष्यांची जशी गति असते तशीच तुझी गति असो.

धकारांतः पुल्लिंगीः बुध् शब्दः ।

| | | |
|---|---|---|
| १ भुत्, भुद् | बुधौ | बुधः |
| सं० ,, | ,, | ,, |
| २ बुधम् | ,, | ,, |
| ३ बुधा | भुद्भ्यां, | भुद्भिः |
| ४ बुधे | ,, | भुद्भ्यः |
| ५ बुधः | ,, | ,, |
| ६ ,, | बुधोः | बुधाम् |
| ७ बुधि | ,, | भुत्सु |

अकारान्त पुल्लिंगी "बुध" शब्द आहे तो या "बुध्" शब्दाहून भिन्न आहे. हा धकारान्त आहे व तो अकारान्त आहे, अकारान्त शब्दाचीं रूपें बनवण्याची रीति यापूर्वी दिलीच आहे. या धकारान्त शब्दाच्या "बु" च्या जागीं कित्येक रूपांमध्यें "भु" होत असतो हें वाचकांनीं येथें नीट लक्ष्यपूर्वक पहावें.

## वाक्य

१ बुधा तुभ्यं किं पाठितम्= शहाण्यानें तुला काय शिकवलें ?
२ बुधे एव दक्षिणां देहि= शहाण्यालाच दक्षिणा दे.
३ भुत्सु विशेषं ज्ञानं भवति= शहाण्यांमध्यें विशेष ज्ञान असतें.
४ बुधां समूहे एव सर्वं धर्मतत्त्वं निश्चितं भवति = ज्ञान्यांच्या समूहामध्येंच सर्व धर्माचें तत्त्व निश्चित होत असतें.

नकारान्तः पुल्लिंगः राजन् शब्दः ।

| | | |
|---|---|---|
| १ राजा | राजानौ | राजानः |
| सं० हे राजन् | ,, | ,, |
| २ राजानं | ,, | राज्ञः |
| ३ राज्ञा | राजभ्यां | राजभिः |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | राज्ञे | राजभ्यां | राजभ्यः |
| ५ | राज्ञः | ,, | ,, |
| ६ | ,, | राज्ञोः | राज्ञाम् |
| ७ | राज्ञि, राजनि | ,, | राजसु |

## शब्द.

मूर्धन् = शिर
ग्रावन् = दगड
तक्षन् = सुतार
पूषन् = पूषा देव
उक्षन् = बैल

प्लीहन् = पानथरी
मज्जन् = मज्जा
अर्यमन् = अर्यमा देव
परिज्मन् = चंद्र, अग्नि
सुत्रामन्, = रक्षक; इंद्र

## वाक्य

१ अराजकः राजानं न नमति= अराजक राजाला नमत नाहीं.

२ मार्गे ग्रावाणः पथिकस्य जनस्य दुःखाय एव भवन्ति = मार्गामध्यें दगड वाटसरू मनुष्याच्या दुःखाला कारणच होतात.

३ उक्षाणः कृषिं कुर्वन्ति अन्नं च उत्पादयन्ति = बैल शेती करतात व अन्न उपजवितात.

४ तक्षा काष्ठस्य गृहं निर्माति = सुतार लांकडाचें घर बनवतो.

५ अस्माकं गृहं तक्षभिः निर्मितम् = आमचें घर सुतारांनीं बनविलें.

६ राज्ञः पदं सर्वेषां मूर्ध्नि भवति किं ? = राजाचें स्थान सर्वांच्या डोक्यावर असतें काय ?

७ राज्ञां अपि राजा ईश्वरः = राजांचाही राजा ईश्वर.

८ राज्ञां पूजा राष्ट्रे भवति = राजांची पूजा राष्ट्रांत होते.

९ सुत्रामा इन्द्रः सर्वस्य रक्षकः = उत्तम रक्षक इंद्र सर्वांचा संरक्षक आहे.

आतां कांहीं संधि केलेलीं वाक्यें वाचा—

प्राज्ञेन सुहृदैव मित्रता कर्तव्या ।
दुर्हृदां शत्रूणां निवारणं सर्वैरवश्यं कर्तव्यम् ।
सुपात्पुरुषो महता वेगेन चलति ।
सुपदां मानवानां यथा गतिरस्ति तथा तव गमनं भवतु ।
बुध एव दक्षिणां देहि
बुधां समूह एव सर्वं धर्मतत्त्वं निश्चितं भवति ।
अराजको राजानं न नमति ।
मार्गे ग्रावाणः पथिकस्य जनस्य दुःखायैव भवन्ति ।
उक्षाण कृषिं कुर्वन्त्यन्नं चोत्पादयन्ति ।
अस्माकं गृहं तक्षभिर्निर्मितम् ।
राज्ञामपि राजेश्वरः ।
सुत्रामेन्द्रः सर्वस्य रक्षकः ।

## सूचना.

वाचकांनीं याप्रमाणें या शब्दांचीं रूपें बनवून त्यांचीं अशीं वाक्यें बनवावीं.

पाते ४६
८८०५७
धा.१५०
कि. पुणाचे

## पाठ ७

पूर्वीच्या धड्यांत आलेल्या महाभारताच्या संस्कृत वाक्यांचेच संधि करून वाक्यें आतां येथें देतो—

(१)

### महाभारतम् ।

यत्किंचित्तेऽभिलषितं तत्सर्वं त्वमवाप्स्यसि । सप्त पंच च समा अहं तेऽन्नं प्रदास्यामि । हे नराधिप ! मया दत्तं ताम्रं पिठरं गृहीष्व । हे सुव्रत ! अनेन पात्रेण यावत्पांचाली वर्त्स्यति तावद्यन्महानसे संस्कृतं फलमूलामिषं शाकं चतुर्विधं तत्तेऽन्नाद्यमक्षय्यं भविष्यति । धर्मवित् कौन्तेयस्तु वरं लब्ध्वा जलादुत्तीर्य धौम्यस्य पादौ जग्राह । भ्रातृंश्च परिषस्वजे । द्रौपद्या सह संगम्य तया वंद्यमानः प्रभुः पाण्डवस्तदानीं महानसे साधयामास ।

### सूचना.

जर या वाक्यांतील कांहीं वाक्यें वाचकांस समजलीं नाहींत, तर याच भागांतील पहिल्या धड्यांत तीं वाक्यें पहावीं व त्यांचा अर्थ समजून घ्यावा. आतां पूर्वी आलेल्या रामायणाच्या संस्कृत वाक्यांचे संधि करून वाक्यें येथें देतो—

(२)

### रामायणम् ।

विलपन्तीं जननीं कौसल्यां धर्मसहितं वचो धर्मात्मा राम उवाच । नास्ति मे शक्तिः पितुर्वाक्यं समतिक्रमितुम् । प्रसादये त्वां शिरसा ।

संस्कृत स्वयंशिक्षक / सातवळेकर श्री. दा.

अस्माकमेव कुले पितुः सगरस्याज्ञया भूमिं खनद्भिः सगरपुत्रैः सुमहान्वधः प्राप्तः। जामदग्न्येन रामेण स्वयं जनन्यपि दितुर्वचनकारणात्कृत्ता। धर्मो हि लोके परमः। धर्मे सत्यं प्रतिष्ठितं। सनातनोऽयं धर्मः पितुर्नियोगे स्थातव्यमिति। तदनुमन्यस्व वनं गमिष्यन्तं माम्।

पितुर्निर्देशपालने एवं व्यवसितं तं रामं समीक्ष्य बाष्पसंरुद्धनयना कौसल्याऽब्रवीत्। पुत्र! गच्छ त्वमेकाग्रेण मनसा। भद्रं तेऽस्तु। अभिरक्षतु त्वां स एव धर्मो यं त्वं पालयसि। सत्येन धर्मेणाभिरक्षितश्चिरं जीवेति।

रामः पुनर्मातुश्चरणावभिवाद्य सीतानिलयं जगाम। तत्सर्वमजानती तपस्विनी वैदेही यौवराज्याभिषेचनमेव प्रतीक्षती तस्थौ। अवाङ्मुखे पत्यौ प्रविष्टे शोकसंतप्ते च वेपमानोदपतत्सीता। दृष्ट्वा तां सीतां धर्मात्मा रामो मनोगतं सोढुं न शशाक। विवृततां च गतः स शोकः। दृष्ट्वा च तत्साऽपि दुःखाभिसंतप्ताऽपृच्छत्। किमिदं प्रभो! केनाऽसि दुर्मनाः? न विराजते छत्रं तवोपरि। नाऽपि व्यजने। अहो अपूर्वश्च मुखवर्णः।

इति विलपन्तीं तां सीतां प्रोवाच राघवः। प्रव्राजयति मां तत्रभवान्तातः। चतुर्दश हि वर्षाणि वस्तव्यं मया दंडके। सोऽहं विजनं वनं प्रस्थितः। त्वां द्रष्टुमिदानीमागतोऽस्मि।

## सूचना

या वाक्यांपैकीं कांहीं वाक्यें जर समजलीं नाहींत तर तीं पूर्वीच्या तिसऱ्या धड्यांत पाहून वाचकांनीं तेथें समजून घ्यावीं. आतां याच्या पुढचा रामायण कथेचा भाग पहा—

# रामायणम् ।

एवमुक्ता तु वैदेही प्रणयादेव संक्रुद्धा भर्तारमिदमब्रवीत् । शस्त्रास्त्रविदुषां वीराणामनर्हं त्वयोदितम् । न श्रोतव्यं तत् । आर्यपुत्र ! पिता माता तथा च पुत्रः पुण्यानि भुंजानाः स्वं स्वं भागमुपासते। नारी त्वैका भर्तु र्भाग्यं प्राप्नोति। ततोऽहमद्यादिष्टैवास्मि वने वस्तव्यमिति । इह प्रेत्य च नारीणां सदैकः पतिरेव गतिः हे राघव! यदि त्वं दुर्गमं वनं प्रस्थितस्तर्ह्यहमपि कुशकण्टकान्मृद्नन्ती तेऽग्रतो गमिष्यामि । भुक्तवति त्वय्यहं भोक्ष्ये । वनेऽपि त्वं मम परिपालनं कर्तुं शक्तः। त्वया वियुक्ताऽहं मरणे निश्चिताऽस्मि।

सान्त्वयित्वा तु तां सीतां धर्मात्मा राम उवाच । सीते ! त्वं कुलीना धर्मनिरता च सदाऽसि । अतस्त्वमिहैव स्वधर्मं समाचर। येन मम मनसः सुखं भवेत् । बहुदोषं हि वनं । तत्र सिंहानां व्याघ्राणां च दुःखदा निनादाः, सरितः सग्राहाः, मत्ता गजाः, कंटकिता लताः, मार्गा अपि निरपाः सुदुःखाश्च । अतः सीते दुःखं वनम् । तत्र चातीव तिमिरं, महान्वातो, नित्या बुभुक्षा, महान्ति च भयानि सन्ति ।

एतच्छ्रुत्वा दुःखिता सीता राममुवाच । ये त्वया वने वस्तव्यतां प्रति दोषत्वेन परिकीर्तितास्तांस्तव स्नेहेन पुरस्कृतान् गुणानेव विद्धि । अदृष्टपूर्वं तव रूपं दृष्ट्वा सर्वे वनचारिणो दूरमपसर्पेयुः । गुरुजनाज्ञया मया त्वया सह वनमवश्यं गंतव्यमेव । हे राम! त्वद्वियोगेन तु मया जीवितमेव त्यक्तव्यम् ।

## सूचना.

यांपैकीं कांहीं वाक्यें समजलीं नाहीं तर तीं पूर्वीं आलेल्या पांचव्या धड्यांत वाचकांनीं पहावीं व तेथें तीं समजून घ्यावीं.

## पाठ ८

या धड्यांत नकारान्त नामांचीं रूपें बनविण्याची रीति पहा—

नकारान्तः पुल्लिंगो ब्रह्मन् शब्दः ।

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ब्रह्मा | ब्रह्माणौ | ब्रह्माणः |
| सं० | हे ब्रह्मन् | हे " | हे " |
| २ | ब्रह्माणं | " | ब्रह्मणः |
| ३ | ब्रह्मणा | ब्रह्मभ्यां | ब्रह्मभिः |
| ४ | ब्रह्मणे | " | ब्रह्मभ्यः |
| ५ | ब्रह्मणः | " | " |
| ६ | ब्रह्मणः | ब्रह्मणोः | ब्रह्मणाम् |
| ७ | ब्रह्मणि | " | ब्रह्मसु |

याप्रमाणें खालीं दिलेल्या शब्दांचीं रूपें बनतात—

शब्द

आत्मन् = आत्मा

अध्वन् = मार्ग

अश्मन् = दगड

मातरिश्वन् = वायु

यज्वन् = यज्ञकर्ता

अर्वन् = घोडा

सुपर्वन् = देव

अग्रजन्मन् = ब्राह्मण, थोरला भाऊ

पाप्मन् = पापी

जित्वन् = विजयी

सुत्वन् = सोमयाग करणारा

धन्वन् = रेतीचा प्रदेश

१ यज्ञे ब्रह्मा सर्वेषु ऋत्विक्षु मुख्यः अथर्ववेदं पठति = यज्ञांत ब्रह्मा सर्व ऋत्विजांत मुख्य अथर्ववेद वाचतो.

२ एते सर्वे अपि अध्वानः एकं एव स्थानं प्रति गच्छन्ति = हे सर्वही मार्ग एकाच स्थानाला जातात.

३ आकाशे मातरिश्वा सर्वत्र संचरति = आकाशांत वायु सर्वत्र संचार करतो.

४ अर्वा अर्वदेशात् अस्मिन् देशे आनीयते = घोडा अरबदेशांतून या देशीं आणला जातो.

५ यज्वभिः यज्ञे यजनं क्रियते = याजकांनीं यज्ञांत हवन केलें जातें.

६ धन्वनि वृक्षाः न भवन्ति = मरुदेशांत वृक्ष होत नाहींत.

७ अध्वनि शीतस्य निवारणार्थं वस्त्रं गृहाण = मार्गांत शीत निवारण्यासाठीं वस्त्र घे.

८ सैनिकाः युद्धे श्रान्ताः अध्वनि एव निद्रिताः = सैनिक युद्धांत थकलेले मार्गांतच निजले.

नकारान्तः पुल्लिंगो वृत्रहन् शब्दः ।

| | | |
|---|---|---|
| १ वृत्रहा | वृत्रहणौ | वृत्रहणः |
| सं० हे वृत्रहन् | हे ,, | हे ,, |
| २ वृत्रहणं | ,, | वृत्रघ्नः |
| ३ वृत्रघ्ना | वृत्रहभ्याम् | वृत्रहभिः |
| ४ वृत्रघ्ने | ,, | वृत्रहभ्यः |
| ५ वृत्रघ्नः | ,, | ,, |
| ६ ,, | वृत्रघ्नोः | वृत्रघ्नाम् |
| ७ वृत्रघ्नि, वृत्रहणि | ,, | वृत्रहसु |

याप्रमाणें पुढील नकारान्त शब्दांचीं रूपें होतात-

शब्द ।

मातृहन् = मातृघातकी.
पितृहन् = पितृघातकी.
गुरुहन् = गुरुघातकी.
ब्रम्हहन् = ब्राम्हणघातकी.

वाक्य ।

१ पितृघ्नभिः अस्मिन् यज्ञे न आगन्तव्यम् = पितृघातक्यांनीं या यज्ञांत येऊं नये,

२ गुरुघ्ने उचितं दण्डं देहि = गुरुघातक्याला योग्य दण्ड दे.

नकारान्तः पुलिंगः श्वन् शब्दः ।

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्वा | श्वानौ | श्वानः |
| सं० हे | श्वन् | हे ,, | हे ,, |
| २ | श्वानं | श्वानौ | शुनः |
| ३ | शुना | श्वभ्याम् | श्वभिः |
| ४ | शुने | ,, | श्वभ्यः |
| ५ | शुनः | ,, | ,, |
| ६ | ,, | शुनोः | शुनाम् |
| ७ | शुनि | ,, | श्वसु |

" श्वन् " शब्दांतील " श्व " च्या ठिकाणीं कित्येक रूपांमध्यें " शु " असें होतें व बाकीच्यांमध्यें " श्व " च राहतें. वाचकांनीं ह्या विशेषपणाचें नीट स्मरण ठेवावें—

वाक्य.

१ त्वया स्वकीयः श्वा कुत्र स्थापितः? = तूं आपला कुत्रा कोठें ठेवलास ?

२ अहं मदीयं श्वानं पुनः न आनेष्यामि = मी माझा कुत्रा पुनः आणणार नाहीं.

३ श्वभिः एव एष कोलाहलः कृतः = कुत्र्यांनींच ही गडबड केली.

४ श्वभ्यः पक्षिभ्यः च अन्नं देहि =कुत्र्यांला व पक्ष्यांना अन्न दे.

नकारान्तो पुल्लिंगो युवन् शब्द

| | | |
|---|---|---|
| १ युवा | युवानौ | युवानः |
| सं० हे युवन् | हे ,, | हे ,, |
| २ युवानं | ,, | यूनः |
| ३ यूना | युवभ्याम् | युवभिः |
| ४ यूने | ,, | युवभ्यः |
| ५ यूनः | ,, | ,, |
| ६ ,, | यूनोः | यूनाम् |
| ७ यूनि | ,, | युवसु |

यांपैकीं कांहीं रूपांमधील " युव " च्या ठिकाणीं " यू " असें होतें, हें वाचकांनीं लक्ष्यांत ठेवावें-

## वाक्यें.

१ युवा पुरुषः ब्रह्मचारी भवितुं अर्हति = तरुण पुरुष ब्रह्मचारी होण्यास योग्य आहे.

२ युवभिः मनुष्यैः एव स्वदेशार्थं युद्धं कर्तव्यं = तरुण पुरुषांनीच स्वदेशासाठीं युद्ध करावें.

३ युवसु अविचारः मदः च भवति = तरुणांमध्यें अविचार व गर्व होतो.

४ युवभ्यः नरेभ्यः वसु देहि = तरुण मनुष्यांसाठीं धन दे.

## सूचना

वाचकांनीं याप्रमाणें शब्दांचीं रूपें करून त्यांचा वाक्यांमध्यें उपयोग करावा

# पाठ ९

याठयांत पुढील श्लोकांचें अध्ययन करा-

न श्रेयः सततं तेजो न नित्यं श्रेयसी क्षमा ।
इति तात विजानीहि द्वयमेतदसंशयम् ॥ ५ ॥

म. भारत वन० अ० २८

अन्वय- तेजः सततं श्रेयः न, नित्यं क्षमा श्रेयसी न । हे तात! इति एतत् द्वयं असंशयं विजानीहि ।

संस्कृत टीका-तेजः तेजस्विता सततं नित्यं सदा श्रेयः न कल्याणकारिणी न भवति । तथा च नित्यं सततं क्षमा अपि श्रेयसी श्रेयस्करी न भवति । हे तात ! हे प्रिय ! इति एवंप्रकारेण एतत् द्वयं असंशयं संशयरहितं विजानीहि जानीहि ।

अर्थ- उग्रताच सतत श्रेयस्कर नाहीं, तसेंच नित्य क्षमाही श्रेयस्कर नाही. हे बापा ! अशीं हीं दोन तत्त्वें निःसंशय तूं जाण.

यो नित्यं क्षमते तात बहून्दोषान्स विंदति ।
भृत्याः परिभवन्त्येनमुदासीनास्तथाऽरयः ॥ ६ ॥

अन्वय- हे तात ! यः नित्यं क्षमते सः बहून् दोषान् विंदति । एनं भृत्याः परिभवन्ति तथा अरयः उदासीनाः ।

संस्कृत टीका- हे तात ! हे प्रिय ! यः पुरुषः नित्यं सदा एव क्षमते क्षमां करोति, सः पुरुषः बहून् अनेकान् दोषान् अगुणान् विंदति प्राप्नोति । के ते दोषाः ? एनं क्षमावन्तं पुरुषं तस्य एव भृत्याः दासाः परिचारकाः परिभवन्ति अपमानयंति । तथा च तस्य अरयः शत्रवः उदासीनाः भवन्ति । शत्रवः अपि तं न गणयन्ति इत्यर्थः ।

अर्थ— हे बापा ! जो नेहमीं क्षमा करतो तो पुष्कळ दोषांनां प्राप्त करतो. याचा नोकर अपमान करतात व शत्रु याविषयीं उदासीन होतात.

सर्वभूतानि चाप्यस्य न नमन्ते कदाचन ।
तस्मान्नित्यं क्षमा तात पंडितैरपवादिता ॥ ८ ॥

अन्वय— च अपि अस्य सर्वभूतानि कदाचन न नमन्ते । तस्मात् हे तात ! नित्यं क्षमा पंडितैः अपवादिता ।

संस्कृत टीका–च अपि यस्य क्षमायुक्तस्य पुरुषस्य सर्वभूतानि सर्वाणि प्राणिजातानि, सर्वे मनुष्याः कदाचन कदापि न नमन्ते न नम्रीभवन्ति । हे तात ! हे प्रिय ! तस्मात् कारणात् नित्यं क्षमा पंडितैः विबुधैः जनैः अपवादिता अपवादेन दोषेण युक्ता अस्ति इति ज्ञाता ।

अर्थ- आणि याला सर्व भूतें कधींही नमत नाहींत. म्हणून हे बापा ! नित्य क्षमा करणें विद्वानांनीं निंदित मानलें आहे.

अवज्ञाय हि तं भृत्या भजन्ते बहुदोषताम् ।
आदातुं चास्य वित्तानि प्रार्थयन्तेऽल्पचेतसः ॥ ९ ॥

म० भा० वन० अ० २८

अन्वय- हि तं भृत्याः अवज्ञाय बहुदोषतां भजन्ते । च अस्य वित्तानि आदातुं अल्पचेतसः प्रार्थयन्ते ।

संस्कृतटीका- हि तं क्षमाशीलं पुरुषं भृत्याः तस्य एव परिचारकाः अवज्ञाय तस्य अपमानं कृत्वा बहुदोषताम् बहून् दोषान् भजन्ते सेवन्ते । च अस्य क्षमाशीलस्य पुरुषस्य वित्तानि धनानि आदातुं स्वीकर्तुं अल्पचेतसः अल्पमतयः जनाः प्रार्थयन्ते इच्छन्ति।

अर्थ- कारण त्याचा नोकर अपमान करून पुष्कळ चुका करतात आणि त्याचीं धनें अल्पबुद्धिवाले घेऊं इच्छितात.

यानं वस्त्राण्यलंकाराञ्छयनान्यासनानि च ।
भोजनान्यथ पानानि सर्वोपकरणानि च ॥ १० ॥
आददीरन्नधिकृता यथाकाममचेतसः ।
प्रदिष्टानि च देयानि न दद्युर्भर्तृशासनात् ॥ ११ ॥

अन्वय- यानं, वस्त्राणि, अलंकारान्, शयनानि, आसनानि च भोजनानि अथ पानानि सर्वोपकरणानि च अचेतसः अधिकृताः यथाकामं आददीरन्। भर्तृशासनात् प्रदिष्टानि देयानि च न दद्युः ॥

अर्थ- यान, वस्त्रें, अलंकार, बिछाने, आसनें व भोजन, पेयें व सर्व उपकरणें अल्पबुद्धिच्या ( क्षमाशील ) लोकांच्या आधीन असलेलीं ते आपल्या इच्छेप्रमाणें घेतील व मालकाच्या आज्ञेनें द्यावयाचींही ते देणार नाहींत.

तात्पर्य क्षमाच नेहमीं करणाऱ्याच्या व्यवहाराची अशी दुर्दशा होते.

## सूचना

वाचकांनीं ह्या श्लोकांचा पुष्कळच अभ्यास करावा. प्रथम श्लोक वाचून अर्थ समजतो कीं काय तें पहावें. न समजला तर अन्वय वाचून पहावा. इतकें करूनही जर समजला नाहीं तर मग मराठी अर्थ पहावा. अशी खटपट केल्यानें संस्कृत अतिशय लवकर येतें.

—

# पाठ १०

आतां नकारान्त शब्दांचीं रूपें कशीं होतात तें पहा-

नकारान्तः पुल्लिंगो ज्ञानिन् शब्दः ।

| | | |
|---|---|---|
| १ ज्ञानी | ज्ञानिनौ | ज्ञानिनः |
| सं० हे ज्ञानिन् | हे ,, | हे ,, |
| २ ज्ञानिनं | ,, | ,, |
| ३ ज्ञानिना | ज्ञानिभ्यां | ज्ञानिभिः |
| ४ ज्ञानिने | ,, | ज्ञानिभ्यः |
| ५ ज्ञानिनः | ,, | ,, |
| ६ ,, | ज्ञानिनोः | ज्ञानिनाम् |
| ७ ज्ञानिनि | ,, | ज्ञानिषु |

याप्रमाणें खालील शब्दांचीं रूपें करावीं—

## शब्द-

| | |
|---|---|
| ब्रह्मचारिन्=ब्रह्मचारी | वाग्मिन्=वक्ता |
| दन्तिन्=हत्ती, | अतिचारिन्=अत्याचारी. |
| शशिन्=चंद्र | शिखरिन्=शिखर असलेला |
| योगिन्=योगी | दूरदर्शिन्=दूरदर्शी |
| त्यागिन्=दाता, संन्याशी | गृहिन्=गृहस्थी |

## वाक्य.

१ ज्ञानिनं पुरुषं राज्ञः समीपं नय = ज्ञानी पुरुषाला राजाच्या जवळ ने.

२ ब्रह्मचारी विद्यां समाप्य गृही भवति=ब्रह्मचारी विद्या प्राप्त करून गृहस्थाश्रमी होतो.

*

३ दंतिना विष्णुदत्तस्य पुत्रः हतः=हत्तीनें विष्णुदत्ताचा मुलगा मारला.

४ पूर्णिमायां शशिनः प्रकाशः वर्णनीयः भवति=पूर्णिमेला चंद्राचा प्रकाश वर्णनीय असतो.

५ योगिनां अचिन्त्या शक्तिः भवति = योगी लोकांची अचिन्त्य शक्ति असते.

६ अस्मिन् संभाषणे तेन वाग्मिना किं प्रतिपादितं=या संभाषणामध्यें त्या वक्त्यानें काय प्रतिपादन केलें?

७ दूरदर्शिना पुरुषेण प्रथमे वयसि ब्रह्मचर्यं अवश्यं पालनीयं= दूरदर्शी पुरुषानें पहिल्या वयामध्यें ब्रह्मचर्य अवश्य पाळावें.

८ गृहिभिः पंचमहायज्ञाः अवश्यं करणीयाः=गृहस्थी लोकांनीं पंचमहायज्ञ अवश्य करावे.

कांहीं नकारान्त शब्दांचीं रूपें थोडींशीं निराळ्या रीतिनें होतात, तीं आतां पहा—

नकारान्तः पुल्लिंगः पथिन् शब्दः ।

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पन्थाः | पन्थानौ | पन्थानः |
| सं० | हे ,, | हे ,, | हे ,, |
| २ | पन्थानं | पन्थानौ | पथः |
| ३ | पथा | पथिभ्यां | पथिभिः |
| ४ | पथे | ,, | पथिभ्यः |
| ५ | पथः | ,, | ,, |
| ६ | ,, | पथोः | पथाम् |
| ७ | पथि | ,, | पथिषु |

पूर्वीं दिलेल्या नकारान्त शब्दाच्या रूपांमध्यें व यांमध्यें असलेला भेद वाचकांनीं लक्ष्यांत ठेवावा.

शब्द ।

मथिन् = मंथनदंड, घुसळण्याची रवी.

ऋभुक्षिन्= इंद्र, मरुत्.

## वाक्य.

१ मम ग्रामस्य कः पंथाः?=माझ्या गांवाचा कोणता मार्ग?

२ तं मंथानं अत्र आनय=तो मंथनदंड येथें आण.

३ ऋभुक्षा ऋभूणां राजा भवति=इंद्र ऋभूंचा राजा असतो.

४ अनेन एव पथा तं नगरं गच्छ=ह्याच मार्गानें त्या नगराला जा.

५ दिव्यैः पथिभिः देवाः ऊर्ध्वं गच्छन्ति=दिव्य मार्गांनीं देव वर जातात.

शकारान्तः पुल्लिंगो विश् शब्दः ।

| | | |
|---|---|---|
| १ विट्, विड् | विशौ | विशः |
| सं० हे ,, ,, | हे ,, | हे ,, |
| २ विशं | ,, | ,, |
| ३ विशा | विड्भ्यां | विड्भिः |
| ४ विशे | ,, | विड्भ्यः |
| ५ विशः | ,, | ,, |
| ६ ,, | विशोः | विशाम् |
| ७ विशि | ,, | विट्त्सु, विट्सु |

याप्रमाणें शकारान्त पुल्लिंगी शब्दांचीं रूपें होतात. आतां यांचा वाक्यांत उपयोग करा—

वाक्य ।

१ विड्भिः राजा नमस्कृतः सत्कारितः च = प्रजांनीं राजाला नमन केलें व त्याचा सत्कार केला.

२ विशि राजा प्रतिष्ठितः = प्रजेमध्यें राजा प्रतिष्ठत होतो.

३ विशां राजानं पश्य = प्रजेच्या राजाला पहा.

४ विड्भ्यः राजा धनं गृह्णाति = प्रजांपासून राजा धन घेतो.

आतां सकारान्त पुल्लिंगी शब्दाचीं रूपें कशीं होतात तें पहा-

सकारान्तः पुल्लिंगो विद्वस् शब्दः ।

| | | | |
|---|---|---|---|
| १ | विद्वान् | विद्वांसौ | विद्वांसः |
| सं० | हे विद्वन् | हे ,, | हे ,, |
| २ | विद्वांसं | ,, | विदुषः |
| ३ | विदुषा | विद्वद्भ्यां | विद्वद्भिः |
| ४ | विदुषे | विद्वद्भ्यां | विद्वद्भ्यः |
| ५ | विदुषः | ,, | ,, |
| ६ | ,, | विदुषोः | विदुषां |
| ७ | विदुषि | ,, | विद्वत्सु |

याप्रमाणें "वस्" प्रत्ययान्त शब्दांचीं रूपें होतात-

वाक्य ।

१ तौ विद्वांसौ पुरुषौ कस्मात् देशात् आगतौ? = ते ( दोन ) विद्वान् पुरुष कोणत्या देशांतून आले?

२ विदुषां सकाशात् एव विद्या प्राप्यते = विद्वानांपासूनच विद्या प्राप्त केली जाते.

३ विद्वद्भिः एव सर्वं जगत् याथातथ्येन ज्ञायते = विद्वानांनींच सर्व जग यथायोग्य जाणलें जातें.

४ एतत्पुस्तकं तेन एव विदुषा रचितं = हें पुस्तक त्याच विद्वानानें रचलें.

वाचकांनीं अशा रीतिनें शब्दांचीं रूपें बनवावीं व त्यांचा उपयोग करुन अनेक वाक्यें रचण्याचा अभ्यास करावा.

# पाठ ११

या धड्यांत पुढील श्लोकांचा अभ्यास करा—

नावमन्ये न गर्हे च धर्मं पार्थ कथंचन ।
ईश्वरं कुत एवाहमवमंस्ये प्रजापतिम् ॥ १ ॥

म० भारत वन० अ० ३२

अन्वय- हे पार्थ ! अहं धर्मं न अवमन्ये न च कथंचन गर्हे । कुतः प्रजापतिं ईश्वरं एव अहं अवमंस्ये ?

संस्कृत टीका- हे पार्थ ! हे पृथानंदन ! अहं धर्मं न अवमन्ये धर्मस्य अपमानं न करोमि । न च कथंचन धर्मं गर्हे निंदयामि । कुतः कथं प्रजापतिं प्रजापालकं ईश्वरं च अहं अवमंस्ये अहं कथमपि तस्य अपमानं न करोमि ।

अर्थ- हे पार्था ! मी धर्माची अवहेलना करीत नाहीं व कशीही त्याची निंदाही करीत नाहीं. मग कसा बरें प्रजापालक ईश्वराचा अपमान मी करीन ?

आर्ताहं प्रलपामीदमिति मां विद्धि भारत ।
भूयश्च विलपिष्यामि सुमनास्त्वं निबोध मे ॥ २ ॥

म० भा० वन० अ० ३२

अन्वय- हे भारत ! अहं आर्ता प्रलपामि इति मां विद्धि । भूयः च विलपिष्यामि । त्वं सुमनाः मे निबोध ।

संस्कृत टीका - हे भारत ! हे भरतकुलोत्पन्न ! अहं आर्ता दुःखिता अस्मि इति अतः एवं प्रलपामि वदामि इति मां त्वं विद्धि जानीहि । इतः अस्मादपि भूयः अधिकं विलपिष्यामि वदिष्यामि । त्वं सुमनाः शोभनमनोयुक्तः भूत्वा मे मम भाषणं निबोध जानीहि।

अर्थ- हे भारता! मी दुःखी होऊन बडबडतें असें माझ्याविषयीं तूं समज. वारंवार मी बोलेन. तूं उत्तम मनानें माझें भाषण समजून घे.

कर्म खल्विह कर्तव्यं जानताऽमित्रकर्शन ।
अकर्माणो हि जीवन्ति स्थावरा नेतरे जनाः ॥ ३ ॥

म० भारत वन० अ० ३२

अन्वय- हे अमित्रकर्शन ! जानता इह खलु कर्म कर्तव्यम् । अकर्माणः स्थावराः हि जीवन्ति, इतरे जनाः न ।

संस्कृत टीका— हे अमित्रकर्शन! न मित्रः अमित्रः शत्रुः तस्य अमित्रस्य शत्रोः कर्शनः नाशकः अमित्रकर्शनः तस्य संबुद्धौ अमित्रकर्शन शत्रुनाशक वीर! जानता प्राज्ञेन विदुषा बुद्धिमता पुरुषेण इह अस्मिन् जगति खलु निश्चयेन कर्म पुरुषार्थः कर्तव्यः अवश्यं करणीयः एव। अकर्माणः कर्महीनाः पुरुषार्थहीनाः स्थावराः वृक्षादयः एव जीवन्ति इतरे जनाः वृक्षपाषाणादिभ्यः अन्ये जनाः पशवः पक्षिणश्च न जीवन्ति। एते प्राणिनः कर्म कृत्वा एव जीवितुं समर्थाः भवन्ति ।

अर्थ- हे शत्रुनाशका ! जाणणाऱ्यानें येथें खरोखर कर्म करावें. कर्म न केल्यानें स्थावरच जगतात. इतर नाहींत.

जंगमेषु विशेषेण मनुष्या भरतर्षभ ।
इच्छन्ति कर्मणा वृत्तिमवाप्तुं प्रेत्य चेह च ॥ ५ ॥

म० भा० वन० अ० ३२

अन्वय- हे भरतर्षभ ! जंगमेषु विशेषेण मनुष्याः इह च प्रेत्य च कर्मणा वृत्तिं अवाप्तुं इच्छन्ति ।

संस्कृत टीका- हे भरतर्षभ ! हे भरतश्रेष्ठ ! जंगमेषु गतिमत्सु भूतेषु विशेषेण विशेषतः मनुष्याः मानवाः इह अस्मिन् जगति,

प्रेत्य परलोके च कर्मणा पुरुषार्थेन एव वृत्तिं आजीविकां अवाप्तुं प्राप्तुं इच्छन्ति ।

अर्थ- हे भरतश्रेष्ठ! जंगमामध्यें विशेषेंकरून मनुष्य येथें व मेल्यानंतर परलोकीं कर्मानेंच आपलें वेतन प्राप्त करूं चाहतात.

उत्थानमभिजानन्ति सर्वभूतानि भारत ।
प्रत्यक्षं फलमश्नन्ति कर्मणां लोकसाक्षिकं ॥

म. भारत वन. अ. ३२

अन्वय- हे भारत! सर्वभूतानि उत्थानं अभिजानन्ति । कर्मणां लोकसाक्षिकं प्रत्यक्षं फलं अश्नन्ति ।

संस्कृत टीका- हे भारत! हे भरतकुलोत्पन्न! सर्वभूतानि सर्वाणि भूतानि सर्वे प्राणिनः उत्थानं अभ्युत्थानं जानन्ति । तथा च कर्मणां स्वकीयानां पुरुषार्थानां लोकसाक्षिकं जनसाक्षिकं प्रत्यक्षं साक्षात् फलं अश्नन्ति भक्षयन्ति ।

अर्थ- हे भारता! सर्व प्राणी शत्रुवर चढाई करणें जाणतात.या कर्माचें लोकामध्यें दिसणारें प्रत्यक्ष फल भोगतात.

## सूचना.

वाचकांनीं ह्या श्लोकांचा उत्तम अभ्यास करावा.श्लोक व अन्वय वाचून अर्थ समजाऊन घ्यावा. न समजला तर संस्कृत टीका वाचावी.इतकेंही करून न समजला तर मग मराठी अर्थ पहावा. असें केलें असतां वाचकांचा उत्तम अभ्यास होईल.

---

# पाठ १२ वा

आतां सर्व साधारण सकारान्त शब्दांचीं रूपें कशीं बनवावीं तें पहा—

सकारान्तः पुल्लिंगः चंद्रमस् शब्दः।

| | | | |
|---|---|---|---|
| १ | चंद्रमाः | चंद्रमसौ | चंद्रमसः |
| सं० हे | चंद्रमः | हे ,, | हे ,, |
| २ | चंद्रमसं | ,, | ,, |
| ३ | चंद्रमसा | चंद्रमोभ्यां | चंद्रमोभिः |
| ४ | चंद्रमसे | ,, | चंद्रमोभ्यः |
| ५ | चंद्रमसः | ,, | ,, |
| ६ | ,, | चंद्रमसोः | चंद्रमसाम् |
| ७ | चंद्रमसि | ,, | चंद्रमस्सु |

याप्रमाणें सकारान्त शब्दांचीं साधारणपणें रूपें बनतात. या-सारखीं खालील शब्दांचीं रूपें बनवावीं.

वेधस्=ब्रह्मदेव
सुमनस्=उत्तम मनानें युक्त
जातवेदस्=अग्नि.
प्रचेतस्=वरुण
कृत्तिवासस्=महादेव
अंगिरस्=अंगिरा ऋषि
उशनस्=शुक्र

सुतपस्=उत्तम तपस्वी
वयोधस्=तरुण मनुष्य
पुरोधस्=परोहित
पुरूरवस्=पुरूरवा राजा
नृचक्षस्=मनुष्यांचा नेता
विश्ववेदस=सर्व धनानें युक्त असणारा.
अनेहस्=निष्पापी

वाक्य ।

१ आकाशे प्रकाशमानं चंद्रमसं बालकः पश्यति = आकाशांत प्रकाशणाऱ्या चंद्राला बालक पाहतो.

२ रात्रौ सर्वं जगत् चंद्रमसा एव प्रकाशितं = रात्रीं सर्व जग चंद्रानेंच प्रकाशिलें जातें.

३ जातवेदसा काष्ठानि दग्धानि = अग्नीनें लांकडें जाळलीं.

४ अंगिरसा ऋषिणा एतत्स्तोत्रं निर्मितं = अंगिरा ऋषिनें हें स्तोत्र बनविलें.

५ उशना राक्षसानां पुरोहितः = शुक्र राक्षसांचा पुरोहित.

६ पुरूरवाः स्वर्गं गतः = पुरूरवा स्वर्गाला गेला.

आतां सकारान्त पुल्लिंगी " पुंस् " शब्दाची रूपें कशीं होतात तें पहा—

सकारांतः पुल्लिंगः पुंस् शब्दः ।

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पुमान् | पुमांसौ | पुमांसः |
| सं० | हे पुमन् | हे ,, | हे ,, |
| २ | पुमांसं | ,, | पुंसः |
| ३ | पुंसा | पुंभ्यां | पुंभिः |
| ४ | पुंसे | ,, | पुंभ्यः |
| ५ | पुंसः | ,, | ,, |
| ६ | ,, | पुंसोः | पुंसाम् |
| ७ | पुंसि | ,, | पुंस्सु |

१ यत्र पुमान् भवति तत्र स्त्री अपि भवति = जेथें पुरुष असतो तेथें स्त्रीही असते.

२ पुंसा यत् कर्तुं शक्यते तत् त्वं कुरु = पुरुषानें जें करणें शक्य तें तूं कर.

३ पुंसु पौरुषं भवतु = पुरुषांत पौरुष असो.
४ नगरेषु पुंसां निवासः भवति = नगरांत पुरुषांचा निवास असतो.

आतां हकारान्त पुल्लिंगी शब्दांचीं रूपें पहा—

हकारान्तः पुल्लिंगः अनडुह् शब्दः ।

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अनड्वान् | अनड्वाहौ | अनड्वाहः |
| सं० | हे अनड्वन् | हे ,, | हे ,, |
| २ | अनड्वाहं | ,, | अनडुहः |
| ३ | अनडुहा | अनडुद्भ्यां | अनडुद्भिः |
| ४ | अनडुहे | ,, | अनडुद्भ्यः |
| ५ | अनडुहः | ,, | ,, |
| ६ | ,, | अनडुहोः | अनडुहाम् |
| ७ | अनडुहि | ,, | अनडुत्सु |

वाक्य.

१ अनड्वान् यवसं भक्षयति = बैल जवाचें शेत खातो.
२ अनडुहा जलं किं न पितम् ? = बैलानें पाणी कां नाहीं प्यालें?
३ तत्र अनडुद्भिः क्षेत्रस्य विनाशः कृतः = तेथें बैलांनीं शेताचा नाश केला.
४ अनडुहां चर्मणा चर्मकारैः पादत्राणं क्रियते = बैलांच्या चामड्यानें चांभारांकडून पायताण बनविलें जातें.

## सूचना

याप्रमाणें वाचकांनीं रूपें बनवून त्यांच्या योगानें अनेक वाक्यें बनवण्याचा अभ्यास वाढवावा.

## पाठ १३

आतां या धड्यांत पूर्वीच्या धड्यांत आलेल्या संस्कृत वाक्यांचीच संधि करून वाक्यें देतों—

## संस्कृत–वाचन–पाठः ।

सततं तेजो न श्रेयः, नित्यं क्षमाऽपि न श्रेयसी, हे तात! इत्येतद् द्वयमसंशयं विजानीहि ।

हे तात! यो नित्यं क्षमते स बहून्दोषान् विन्दति । एनं भृत्याः परिभवन्ति तथाऽस्य उदासीना भवन्ति ।

अपि चाऽस्य सर्वभूतानि कदाचन न नमन्ते । तस्माद्धे तात! नित्यं क्षमा पंडितैरपवादिता ।

ते हि भृत्या अवज्ञाय बहुदोषतां भजन्ते। अस्य च वित्तान्यादातुमल्पचेतसः प्रार्थयन्ते ।

यानं वस्त्राण्यलंकाराञ्छयनान्यासनानि च भोजनान्यथ पानानि सर्वोपकरणानि चाचेतसोऽधिकृता यथाकाममाददीरन् । भर्तृ–शासनात् प्रदिष्टानि देयानि च न दद्युः ।

हे पार्थ! अहं धर्मं नाऽवमन्ये नच कथंचन गर्हे। कुतः प्रजापतिमीश्वरमेवाऽहमवमंस्ये?

हे भारत! अहमार्ता प्रलपामीति मां विद्धि । भूयश्च विलपिष्यामि । त्वं सुमना मे निबोध ।

हे अमित्रकर्शन! जानतेह खलु कर्म कर्तव्यं। अकर्माणः स्थातु न हि जीवन्ति नेतरे जनाः।

हे भरतर्षभ! जंगमेषु विशेषेण मनुष्या इह च प्रेत्य च कर्म पुनिमकर्तुमिच्छन्ति।

हे भारत! सर्वभूतान्युत्थानमभिजानन्ति। कर्मणां लो… …क्षिकं प्रत्यक्षं फलमश्नन्ति।

## सूचना.

वाचकांनीं हीं वाक्यें वारंवार बनवावीं व त्यांचा अर्थ जाणा… … यत्न करून सुद्धां कांहीं वाक्यांचा अर्थ समजला नाहीं त… पूर्वींच्या धड्यांत या वाक्यांचा अर्थ पहावा व तो समजून घ्याव… वाचकांनीं जर पूर्वींचे धडे उत्तम केले असतील, तर त्यांस… वाक्यें सहज समजतील. आतां यांतील समास पहा—

## समास.

१ असंशयं-न-विद्यते संशयः यत्र तद् असंशयं। (संशयरहित

२ सर्वभूतानि-सर्वाणि च तानि भूतानि। (सर्व प्राणी)

३ बहुदोषता-बहवः दोषाः बहुदोषाः। बहुदोषाणां भावः बहु… दोषता (पुष्कळ दोष असणें)

४ अल्पचेता = अल्पं चेतः यस्य सः अल्पचेताः। (अ… बुद्धीचा)